## नागपूर महानगरपालिका, नागपूर

# स्वच्छ भारत अभियान
## अंतर्गत

**स्वच्छ सर्वेक्षण –२०२२ साठी**

# प्रतियोगीता



# विषय

## स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण २०२२

### —: स्पर्धेचे प्रकार :—

### १) चित्रकला/ पोस्टर स्पर्धा **(Drawing/ Poster)**

स्पर्धकांनी स्पर्धा कालावधीत वर नमुद विषयांवर आधारीत चित्र /पोस्टर तयार करून व त्याच्या एका कोपऱ्यात आपले नाव, मोबाईल क्र., शहराचे नाव व कोड (नागपूर —802710) सुस्पष्ट नमुद करून सदर कार्यालयात जमा करावे.

### २) भित्तीचित्रे **(Murals)** स्पर्धा

स्पर्धकांनी स्पर्धा कालावधीत वर नमुद विषयांवर आधारीत कमीत—कमी २ चौरस फुट फ्रेमवर भित्तीचित्रे **(Murals)** बनवावित व त्याच्या एका कोपऱ्यात आपले नाव, मोबाईल क्र., शहराचे नाव व कोड (नागपूर —802710) सुस्पष्ट नमुद करून सदर कार्यालयात जमा करावे.

### ३) पथनाटय **(Street play)** स्पर्धा

स्पर्धकांनी स्पर्धा कालावधीत वर नमुद विषयांवर आधारीत जास्तीत— जास्त १० मिनिटांचे पथनाटय (Street play) चित्रिकरण करावे. जास्तीत— जास्त ६ सदस्यांचा ग्रुप असावा. सदर व्हिडीयो च्या सुरूवातीस आपल्या ग्रुप लिडरचे नाव, मोबाईल क्र., शहराचे नाव व कोड (नागपूर —802710) सुस्पष्ट नमुद करून सदर कार्यालयात जमा करावे. सदर व्हिडीयो १०० MB साईज पर्यंत असावा.

### ४) लघुचित्रपट **(Short Film / Movie)** स्पर्धा

स्पर्धकांनी स्पर्धा कालावधीत वर नमुद विषयांवर आधारीत जास्तीत— जास्त ०५ मिनिटांचे लघुचित्रपट (Short Film / Movie) चित्रिकरण करावे. सदर व्हिडीयो कोणतेही मोबाईल ॲप वापरून करता येईल. सदर व्हिडीयोच्या सुरूवातीत आपले नाव, मोबाईल क्र., शहराचे नाव व कोड (नागपूर —802710) सुस्पष्ट नमुद करून सदर कार्यालयात जमा करावे. सदर व्हिडीयो १०० MB साईज पर्यंत असावा.

### ५) जिंगल्स **(Jingles)** स्पर्धा

स्पर्धकांनी स्पर्धा कालावधीत वर नमुद विषयांवर आधारीत कल्पक असा ऑडियो (जिंगल ) जास्तीत— जास्त ३० सेंकदा पर्यंत तयार करावा.सदर ऑडिओच्या सुरूवातीस आपले नाव, मोबाईल क्र., शहराचे नाव व कोड (नागपूर —802710) सुस्पष्ट नमुद करून सदर कार्यालयात जमा करावे. सदर ऑडियो १० MB साईज पर्यंत असावा.

## स्वच्छ सर्वेक्षण —२०२२

कोरोना पासून बचावांच एकच उत्तर ........

मास्क *सॅनिटाझर * सुरक्षित अंतर

## स्पर्धोनिहाय पुरस्कार

| | | |
|---|---|---|
| १. | प्रथम पुरस्कार | मोमेंटो व प्रमाणपत्र |
| २. | द्वितीय पुरस्कार | मोमेंटो व प्रमाणपत्र |
| ३. | तृतीय पुरस्कार | मोमेंटो व प्रमाणपत्र |

टीप :— कोणत्याही प्रकारात किमान विस स्पर्धक.आल्यासच त्या प्रकारातील पुरस्कार दिले जातील

## सर्व साधारण सुचना

१) वरील स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी नागपूर शहराचे नागरीक असणे बंधनकारक आहे.

२) इच्छुक स्पर्धकांनी दि. ३०/१२/२०२१ कार्यालयीन वेळेत सकाळी ९:४५ ते साय. ६:१५ वाजे पर्यंत स्वच्छ भारत अभियान कक्ष, पाचवा माळा, बी विंग, छत्रपती शिवाजी महाराज प्रशायकीय इमारत, नागपूर महानगर पालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर —४४०००१ येथे जमा करावे.
दिलेल्या कालावधीनंतर येणाऱ्या स्पर्धाकांच्या कलाकृती/कार्य ग्राहाय धरणे जाणार नाही.

३) एक स्पर्धक वरीलपैकी कीतीही स्पर्धेत भाग घेऊ शकतो.

४) आपली कलाकृती/कार्य कार्यालयात जमा करतांनी आपली मीहिती अचुक दिली आहे याची खात्री करून घ्यावी.

५) स्पर्धकांनी आपले साहित्य स्वत:च वापरायचे आहे., नागपूर महानगरपालिके तर्फे कुठलेही साहित्य पुरविण्यात येणार नाही.

६) सदर स्पर्धा ही शहरातील सर्व नागरीकांसाठी आणि शहरातील शाळेमधील सर्व विद्यार्थासाठी खुली असून प्रवेश निशुल्क आहे.

७) कोणत्याही प्रकारच्या बनाव केल्याचे निदेर्शनास आल्यास स्पर्धकास स्पर्धेतून तात्काळ अपात्र करण्यात येईल. याबाबत श्री. राधाकृष्णन बी. आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

८) कोणत्याही स्पर्धेत भाग घेत असतांना मास्क व सुरक्षित अंतराचे पालन करणे बंधनकारक राहील.

९) स्पर्धेचे निकाल सुयोग्य दिवशी सार्वजनिक स्वरूपात **www.nmcnagpur.gov.in** या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येतील.

१०) कुठल्याही अधिक माहिती करीता nmcsbmcitizenengagement@gmail.com वर संपर्क साधावा.

नोडल अधिकारी,
(घनकचरा व्यवस्थापन विभाग)
नागपूर महानगरपालिका, नागपूर